**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक.** विवन्यावि-२०१२/नोटरी/ई-शाखा,
विधी व न्याय विभाग,
रूम नं.३०४ (मुख्य), ३ रा मजला,
राजगुरू हुतात्मा चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई§ ३२.
दूरध्वनी क्रमांक.(०२२) २२०२८६१९
दि: १३ एप्रिल, २०१२

**प्रति,**

**सर्व मा. जिल्हा न्यायाधीश.**
**सर्व मा. जिल्हाधिकारी.**

**महोदय,**

महाराष्ट्र शासनामार्फत नियुक्त केलेल्या नोटरींबाबत असे निदर्शनास आले आहे की, नोटरी म्हणून दस्तऐवज साक्षांकित करताना, नोटरी कायदा १९५२ वा नोटरी नियम १९५६ मधील कलम/नियम विचारात घेऊन दस्तऐवज साक्षांकित करणे, नियम १० नुसार फी आकारणे इ. अपेक्षित असून सुध्दा नोटरी म्हणून स्वाक्षांकित करण्याकरिता सर्वसामान्यांकडून अतिरिक्त/अधिक फी वसूल करण्यात येत असते. तसेच काही नोटरी व्यावसायिक गैरवर्तणूक अथवा गैरव्यवहार करीत असल्याबाबतच्या तक्रारी विभागाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

सबब, अशा गोष्टींना आळा घालण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हा न्यायालय व तालुका न्यायालय यांनी आपल्या व आपल्या अधिनस्त कार्यालयांच्या सूचना फलकावर पुढील मजकूर ठळक अक्षरात प्रसिध्द करावा,

नोटरींनी, नोटरी नियम १९५६ च्या कलम १० मधील तरतुदीनुसारच फी आकारावी व त्यासाठी अनुज्ञेय पावती संबंधित पक्षकारास तात्काळ उपलब्ध करण्यात यावी. नोटरीने काही गैरव्यवहार अथवा गैरवर्तणूक अथवा नियमबाह्य वर्तन केल्यास, नोटरी नियम १९५६ च्या नियम १३ (फॉर्म १३) अन्वये संबंधित नोटरींविरुध्द सक्षम प्राधिकारी, विधि व न्याय विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे तक्रार पाठविण्यात यावी.

सुलभ संदर्भाकरित नियम १० अन्वये आकारण्यात येणाऱ्या फी संबंधीचे दरपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

उपरोक्त बाब आपल्या अधिनस्त कार्यालयांचे माहिती व उचित कार्यवाहीसाठी कृपया निदर्शनास आणण्यात यावी, अशी विनंती आहे.

**आपला,**
**सही**
**(एस. एस. शिंदे)**
**सॉलिसिटरी-नि-सह सचिव**

**सोबत: वरीलप्रमाणे.**